# हे भगवान!



कवि - सद्गुरु प्रभू

आर्ट कॉर्नर

ॐ

# हे भगवन् !

## (काव्यसंग्रह)

कवी

सद्गुरु प्रभू आजगांवकर

जानेवारी १९९२

संपादन : गुं. फ. आजगांवकर
प्रबोधन रिसर्च असोशियएःटस
१७ के. बी. निवास, मुंबई ४०० ००४.

**प्रकाशकः**
प्रबोधन रिसर्च असोसिएट्स
१७, के. जी. बी. निवास मुं. ४

**संपादन : गुं.फ. आजगांवकर.**
१७ कुडाळ्देशकर गौड ब्राह्मण निवास
मुंबई नं. ४

**कविः**
सद्गुरु प्रभु आजगांवकर
पांडुरंगवाडी औदुंबर, डोंबिवली.(पूर्व)

**सर्वाधिकारः** प्रकाशकाधीन

**मुद्रकः**
इमेज डी.टी.पी. सर्विसेस्, गिरगाव मुं. ४

किंमत १५ रु.

# हे भगवन्

## 'स.फ. चे पसायदान

प्राचार्य डॉ.व.दि.कुलकर्णी

'हे भगवन' या प्रस्तुत संग्रहातील कविता म्हणजे स.फ.आजगांकर यांनी विश्वात्मक देवाची मनोभावे केलेली अक्षरपूजा आहे. देहात्म बुध्दीचा जसजसा लोप होत जातो तसतसा विश्वात्मकतेचा प्रकाश अंतर्याम व्यापून राहतो. बंध तुटतात , जाणीवा मोकळया होतात आणि सारे विश्व आपले वाटू लागते. विश्व प्रेमानें भरुन राहिल्याचा अनुभव येऊ लागतो. मध्यान्हीची तापलेली पृथ्वी , आपले पाय पोळू नयेत म्हणून आपली सावली पायतळी अंथरते. आईनं बाळाच्या डोक्यावर उन्हात आपल्या लुगड्याचा पदर धरावा तशी ही माया असते. आपलाही जीव विश्व भरुन रहाण्यासाठी विस्तारत जातो. विश्वसंवेदना आत्मसंवेदना होऊ लागते. देवासाठी फुले तोडतांना वेलीच्या वेदनांनी मन विव्हळ होतं; अन् वाऱ्यानं गळून पडलेल्या फुलांनीच पूजा करण्याची भावना मनी दाटून येते. देवळांतल्या देवाच्या दर्शनाला निघावं तर वाटेतल्या दुःखितांच्या सेवेतच वेळ निघून जातो आणि देवदर्शन हरवतं; पण देव न भेटताच परमेश्वर भेटल्याचं समाधान लाभतं. पानं, फुलं,फळं, ऊन, वारा, पाऊस, धरती, आकाश, नदी, नाले, समुद्र, चंद्र, सूर्य यांच्याशी संवाद सुरु होतो. श्री सद्गुरु आजगांवकरांची कविता ही सृष्टीशी हृदयसंवाद करणारी कविता आहे.

ही कविता जाईच्या फुलासारखी साधी पण मधु-गंधवती आहे. निर्मळ आनंदमयी आहे विश्वकवी रविंद्रनाथांच्या प्रतिभेची प्रभा या काव्यपुष्पांवर पसरल्याचं भासता भासता ही प्रभा कवीची स्वतःची सच्ची आत्मप्रभा आहे याचा प्रत्यय येत रहातो. तीच गोष्ट संतवाणीची, संतवाणीचे सूर इथं उमटू बघतात पण ते कवीच्या आत्मानुभवात लुप्त होऊन स्वतःचे स्वतंत्रपणे प्रकटू लागतात दीर्घकालीन व्याधींनी जर्जर झालेल्या देहातील कँवीचा आत्मा चराचरातील चिद्रूप पाहून भावमग्न होतो. मुंगीसाठी हळहळतो. साध्या साध्या अनुभवातून चिदानंदाशी भेटू बघतो.

आजगांवकरांची कविता ही भक्तिमार्गी आहे पण रुढार्थाने भक्तिमार्गी नाही. ती तशी वेगळी आहे. भारतीय अध्यात्मवादी, गुढवादी, spiritual mystic *आहे. ती प्रामाणिक आहे. सहजसुंदर आहे. मुक्त आहे स्वच्छ आहे. विश्वात्मक हृदयाची आहे. विश्वप्रेमाची आहे. विश्वदेवाला दुःख अर्पण करणारी ही कविता नाही; तर ती त्याच्या चरणी आनंदपुष्पे समर्पू पहाणारी आहे. ती सर्वांची सर्वकालची कविता आहे.*

हवेला ना भिंती । हवा मुक्त असे । आम्ही व्हावे तैसे । बंधमुक्त ।
प्रकाशा असे का । बंधन सीमांचे । वागणे आमुचे । तैसे व्हावे।।

पर्जन्या असे का । वर्षाव बंधन । बंधमुक्त जन । आधी व्हावा ।।

आकाश सर्वांचे । विश्वबांधवांचे यथार्थ सर्वांचे । हीत पाहू ।।

श्री सद्‌गुरु प्रभु आजगावकरांची कविता विश्वकल्याणाचं 'पसायदान' मागत आहे. इतकी प्रसादपूर्ण कविता अपवादानंच वाचायला मिळते. ही कविता जीवन प्रेमिकांना आणि काव्यरसिकांना सुखशांतिप्रद ठरेल !

—व.दि. कुलकर्णी
११-११-९१

**प्रकाशकाचे प्रास्ताविक,**

*'हे भगवन्' ह्या काव्यसंग्रहाचे कवी श्री. सद्गुरु प्रभु आजगांवकर यांची नव्याने ओळख करून देण्याची गरज नाही. श्रीयुत प्रभु आजगांवकर हे रत्नागिरी जिल्ह्यात व विशेषतः सावंतवाडी विभागावर लोकप्रिय व कार्यतत्पर शिक्षणाधिकारी म्हणून गाजले. कॅबीनेटमंत्री भाई सावंत यांचा त्यांच्यावर विशेष लोभ होता. मातृभक्त व नॉन करप्ट ऑफिसर म्हणूनहि त्यांची ख्याती आहे.*

*'सो ऽ हं ध्यान तरंग' हा त्यांचा काव्यसंग्रह स्वामी अमलानंद, स्वामी सत्यदेवानंद सरस्वती व इतर अनेकांनी गौरविला. 'कृपेची साऊली माऊली माझी' हे त्यांचे आईवरील पुस्तक अनेकांनी वाखाणले आहे. श्री. पु. ल. देशपांडे, मधुमंगेश कर्णिक, 'तरुण भारत' बेळगांव, डॉ. ग्रामोपाध्ये यांच्या सारख्यांनी मातृप्रेमाचे मंगल स्तोत्र म्हणून त्याचा गौरव केला. ' भाव माझ्या अंतरीचे' हा त्यांचा काव्यसंग्रह सुप्रसिद्ध काव्यसमीक्षक वा. रा. ढवळे ह्यांनी मुद्दाम पत्र लिहून वाखाणलेला आहे. दत्तावतार टेंबेस्वामी मंत्रालयाचे 'श्री. राघवेंद्रस्वामी' 'श्री. सांतेरी स्तवन' 'श्रीदेव वेतोबा स्तवन मुक्तावली', श्री सद्गुरु सहजानंद महाराज पुणे, चैतन्यस्वामी मुंबई, यांच्याविषयी त्यांनी लिहिलेली स्तोत्रें भक्तजनांना पंसत पडली आहेत. आतापर्यंतचे त्यांचे सर्व लिखाण आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहे. ग्रंथ थोडे पण सकस आहेत. आजच्या त्यांच्या काव्यसंग्रहाचे समालोचन मुंबई युनिव्हर्सिटीचे मराठी विभागाचे प्रमुख (आता निवृत्त) डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी केल्यामुळे संग्रहाला विशेष शोभा आली आहे. भगवत्‌गीतेचे गाढे अभ्यासक आणि वक्ते म्हणून व. दि. यांची ख्याती आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार !*

— गुं. फ. आजगांवकर



# भाग १ला

# (१) हे भगवन्

यथाशक्ती तुझे पूजन केले.
भजन केले,
गुणसंकीर्तन केले,
जगाचे कल्याण –
तू करावेंस म्हणून - - - - - - !
मी सतत तुझ्याजवळ असेन !
तुझ्यासारखाच सर्व ठिकाणी !
पूजेसाठी मी जी फुले आणली –
ती खुडताना - - - - - मी,
वेदना ऐकली.
वेलीची ती वेदना होती कदाचित्,
- - - - - तो आभासहि असेल !
म्हणून, - - - - - -
फुलामागून फुलें मी तोडत गेलो,
वेदनेची कळ वाढत गेली.
आता - - - - - -
फुलांची रोपटी अश्रुंचा शिडकावा करीत होती.
हे परमात्मन,
आजपासून मी तुला - - - - -
फुलें अर्पण करीन ; पण ती - - - - -
वा-याने खाली पडलेली ।
किंवा - - - -
गळलेली !- - - - तोडलेली नव्हेत.
तू एकच कर - - - - अशा दुर्दैवी वेली
किंवा
जी जी फुलझाडें असतील - - - -
त्यांना
वेदना सहन करण्याची शक्ती दे.
कारण - - - -
त्या असहय वेदना तूं - - - -
कमी करु शकणार नाहीस ;
मानव निर्मित ते दुःख आहे.
तुला प्रसन्न करुन घेण्यासाठी !

# (२) हे भगवन्

भूमातेचे प्रेम किती अपार आहे !
फळें, फुलें, धान्य, चारा - - - -
शेती, नद्या, नाले - - - -
सुशोभित पर्वतांच्या रांगा - - - -
या सर्वांनी नटलेली भूमाता
किती दयाशील आहे
सर्वांना आधार देणारी - - - सा-यांना क्षमा करुन
जवळ करणारी,
ओतप्रोत वात्सल्याने भरलेली - - -
आपल्या लेकरांना किती करुणेने वागवित आहे !
पण - - - -
आम्ही मुले - - -
क्षुद्र स्वार्थाने - - -
एकमेकांचे दुःख वाढवितो !
हे करुणाकरा,
आमच्या विचार प्रवाहांना
योग्य दिशा दाखव
व - - - -
एकमेकाचा गळा घोटणारे हात
हस्तांदोलनात - - - -
परिवर्तित कर.

## (३) हे भगवन्

जो शेतकरी आहे त्याला - - -
- - - शेत नांगरु दे.
बी पेरु दे.
तण काढू दे.
दाणे घेऊ दे.
त्याच्या कामातील अडचण
दूर होऊ दे.
त्याला पाण्याचे दुर्भिक्ष नको.
साधनाची कमतरता नको.
तोच सर्वांचा पोशींदा आहे.
त्याच्या कामांत घाम आहे.
भू मातेवर - - - त्याचे प्रेम आहे.
त्याला सुखी, समाधानी ठेवण्याची
आम्हाला बुध्दी दे

## (४) हे परमात्मन् !

तुला रात्रंदिवस - - -
मी शोधत होतो.
कित्येक रात्री
झोपेशिवाय घालविल्या.
एके दिवशी - - -
- - - झोपेनेच - - -
झोपेला - - -
झोपविले.
काही वेळानंतर - - -
जाग जागवू लागली - - -
तरीही - - -
देह दिसेना.
सर्वत्र प्रकाशच प्रकाश !
आकाश, तारे, ग्रह प्रकाशस्वरुप
झाल्याने,
असून नसल्यांतच जमा झाले.
मी व माझी जाणीव......
नंतर मीचे अस्तीत्वच कुठे आढळेना.
तुझेही अस्तीत्व कोठेच आढळेना.
माझ्या जाणीवेचा हा प्रकाश काय?
आणि या प्रकाशाचे केंद्र !
की केंद्रा शिवाय प्रकाश !
माझी जाणीव जेथून निघाली
ते उगमस्थान म्हणजे केंद्र
असेल काय?
की........
रुपातीत नामातीत ते आहे ?
आता मला असे वाटू लागले आहे की
प्रकाश हे नावही सार्थ नाही.
मला, मी कोण हे कळल्यावर
तुझा शोध लागेल.
आता मौनाचे
मौन सुरु झाले आहे.

# (५) हे भगवन्,

मी एकदा असाच चाललो होतो.
दिशा ठरलेली नव्हती. हळू हळू दुपार
होत आली. सूर्य मस्तकावर आला होता.
रखरखीत उन्हातून चाललो होतो.
स्वतःचेच भान नव्हते. आतापर्यंत तच्या
प्रवासांत माझी साऊली
मला सोबत करत होती.
आता तीही कोठे दिसेना.
आजुबाजूला पाहिले - - -
पाया खालीच ती होती.
'मी तुला तुडवत कसा चालूं?' - - - मी विचारले,
" तुझ्या पोळलेल्या पायाला थोडा विरंगुळा वाटावा
म्हणून मी तुझ्या पायाखाली —
सोबत करत आहे !
भूमातेच्या आज्ञेने " ती म्हणाली
आईच्या मायेचा वर्षाव
माझ्या मनांतून दुथडी वाहू लागला,
तेवढयांतच मला माझ्या जन्मदात्या आईची आठवण झाली.
मी आणि आई तीर्थ यात्रेला
पायी चाललो होतो.
सूर्याच्या तळपत्या उन्हाची
प्रखरता आईच्या लक्षात आली
तिनें - - -
माझ्या हाताला धरून - - -
आपल्या पदराचे एक टोक माझ्या माथ्यावर ठेवले
मला तेवढेच गार वाटले.
हे परमात्मन्, माऊली कृपेची साऊली आहे.
सर्व प्राणीमात्रांत कमी अधिक स्वरुपात
तिचे अस्तीत्व आहे.
हृदयातील वात्सल्याचा हा झरा म्हणजे
तुझ्या कृपेचा साक्षात्कार आहे !

# (६) हे भगवन्

हे
मेघराजा !
तूं
रंगाने
कुट्ट काळा दिसलास
तरी
माझ्या दृष्टीमध्ये
तुला
तुझ्या सौदर्याचे
पुजास्थान दिसेल.
हे जलधरा,
तू
केवढाही कडकडाट केलास
तरी
माझ्या श्रवणेद्रियांना
तो आवाज
कोकीळेच्या मधुर कुजनासारखाच वाटेल
कारण......
त्या कडकडाटा पूर्वी
प्रकाशाची जी झलक
वेडी वाकडी नागमोडी मार्ग घेऊन......
क्षणांत निघेल.
ती
विश्वाला.......
क्षणभर का होईना......
उजाळा देईल ..... आणि .....
या पृथ्वीवर....
संततधार जीवनाचा शिडकावा होईल.
पृथ्वी न्हाऊन निघेल.
चराचरांत,
चैतन्याचे मंगल दायी.....
दर्शन घडेल.
भूमी गंधवती होईल
म्हणूनच तूं
प्राणी मात्रांना मिळालेली
परमेश्वराची देणगी आहेस.

# (७) हे भगवन्

मी तुझ्या चरणाचा दास आहे.
सेवा म्हणजे काय हे मला कळत नाही.
सेवासंस्था मला माहित नाही.
मी समाज सेवकहि नाही.
मात्र.....
चालत असताना रस्त्यांत.....
काटा दिसला
तर तो बाजूला करतो.
दगड धोंडे दूर करतो.
जरा पुढे गेल्यावर......
भुकेलेला प्राणी दिसला......
व
माझ्याकडे जर काही खाणे असले तर...
त्याला खाऊं घालतो.
त्याच्या पायांत काटा गेला
तर तो काढतो.
जर एखादा जखमी प्राणी आढळला......
तर त्याची जखम धुऊन....
त्याला मलम पट्टी बांधतो.
मंदिरात जाण्याचा योग आला व....
बाहेर भिकारी असला तर
त्याचे दुखः समजून घेतो;
व...
ते दूर करण्याचा प्रयत्न करतों
असा वागताना......
तुझे दर्शन झाल्याचा आनंद होतो
मात्र.........
पुजाऱ्याची भेट तशीच राहून जाते.

# (८) केव्हां कळणार ?

हे निर्झरा
स्फटिकाप्रमाणें तुझे जीवन
किती स्वच्छ व पारदर्शक !
मी......
तुला नेहमी पाहतो, तर......
तू वाहत आहेस
व तुझे चारित्र्य कायम....
टिकून राहिले आहे.
कुणासाठी....
तुझा प्रवास....
रात्रंदिन सुरु आहे ?
एक गोष्ट खरी की....
अनेक पांथस्तांची....
तहान......
तू भागवीत आहेस व......
तुझ्या काठावर
अनेक
झाडे, झुडपे, वेली
आपापले जीवन जगत आहेत.
तूं थांबत नाहीस.
तुझी भावंडे....
निरनिराळ्या ठिकाणाहून.....
अशीच पांथस्थांची तहान शमवून...
तुला...
वाटेत भेटत आहेत.
त्यांना घेऊन......
तुम्हा सर्वांचा प्रवास.....
आईला भेटण्यासाठी...
सुरु झाला आहे.
वाटेतील शेतकरी.....
तुम्हाला कवटाळून आपापल्या शेतांत
पाटातून फिरवत आहेत.
त्यांच्या घरातून...
झोपडयांतून ....
समृध्द उत्पादन त्यांच्या
कुटुंबियांच्या चेहऱ्यावर
प्रसन्न स्वरुपात प्रतिबिंबित होत आहे.
आता......
तुमच्या आईची भेट होण्याची वेळ
जवळ येत चाललेली आहे........
ती पहा....
भेटण्यास आतुर झालेली तुमची आई !
तिच्या कुशीत बिलगून पुढे चला.
आता लौकरच तुमची व तुमच्या.....
पित्याची भेट होणार.
ती गर्जना ऐका.
त्याने तुम्हांला ओळखले नाही.
त्याचे पाऊल
पुढे मागे होत आहे.
तुम्ही मागे फिरू नका
धावा व पित्याच्या जीवनाशी एकरुप व्हा.
तुमच्या जीवनाचे......
सार्थक झाले असे मानू नका.
मागाहून तुमची भावंडे...
अशीच येत राहतील.
त्यांना दूर लोटू नका.
कारण.....
तुम्ही सारे प्रकाश मार्गाने...
एक ना एक दिवस.....
वर जाऊन
विश्वाचे वर्तुळ पूर्ण करणार.
इतरांना देण्यात जगणे आहे.

इतरांना जगविण्यात......
जीवनाची कृतार्थता आहे.
पण....
आम्हांला हे केव्हा कळणार ?
की.....
कळणारच नाही !!

# (९) हे भगवन्

रात्र होती.
कुट्ट अंधार होता.
समोरचे काहीच दिसत नव्हते.
अशा वेळी....
माझा प्रवास सुरु होता.
मुक्कामावर......
लौकरच पोहोचावयाचे होते
म्हणून......
जरा आडवाटेने निघालो.
त्या गावातील सरावाची वाट
मी अशाही दाट अंधारातून......
जाऊं शकत होतो.
अशावेळी पायाला ठेच लागली
व
वेदनेची तिडिक माझ्या डोक्यातून
आरपार निघून गेली.
तेवढयातच......
हाय अयाई ! म्हणून......
आकांताचे......
विव्हळणे ऐकले.
काळोख असल्याने
मी
स्पष्टपणे पाहू शकत नव्हतो.
पण........
माझा पाय विव्हळू लागल्याची.
संवेदना.....
मला जाणवली.
जरा ध्यान दिले पाया खाली तर.....
कण्हण्याचा आवाज
हे काय सर्वच विचित्र !
मग........
पुढे जाण्याचे थांबवून
जेथून वेदनेचा आवाज सूर धरत होता.

त्या दिशेला खाली पाहून......
विचारण्याचे धाडस केले.
' अरे तू कण्हतोस का ?'
प्रतिसाद म्हणून तो उत्तरला
' अरे, माझे भाईबंद......
मंदिरातील मूर्ति बनले.
मी मात्र.....
असा एका बाजूला......!
आड वाटेला म्हणून मला लाथांचा प्रसाद !....
व
मंदिरातील मूर्तीच्या चरणावर......
तुमचे मस्तक नम्र होते.
त्याला तुम्ही देव मानतां.....
व
मला मात्र दगड समजतां. "
खाली वाकलो....
व
त्याला अलगद उचलले.
तो सापडला.
अेवढया अंधारांतहि !
मी.....
त्याला....
एका मंदिरांत नेऊन ठेवले.
दुसऱ्या दिवशी मंदिरांत गेलो.
पुजाऱ्याने पुजा आटोपलेली होती.
निरांजन पेटत होते.
सर्व मूर्तींबरोबर त्याच्या मस्तकावर
एक फूल
निरांजनाच्या प्रकाशात
दिमाखाने मिरवत होते.
मी म्हणालो.....
' हे परमात्मन्,....
जगांतील सर्व दगडांचे विश्वमंदिर
उभारण्याच्या कामांत.....
सहभागी होण्याचे मला सामर्थ्य दे.

# (१०) नव्या प्रवासाची सुरवात

तो :

ही मेणबत्ती घेऊन तू कोठे......
चालला आहेस?
हा प्रकाश तुला कसा पुरणार ?
आणि वारा आला तर....
मेणबत्तीची ज्योत....
विझेल त्याचे काय ?
कंदिल किंवा विजेरी...
घ्यावयास....
कसा विसरलास ?
सोबत शिदोरी आहे ना !
तहान लागली तर....
पाण्याचे काय ?

मी :

तू फक्त अडचणी
विचारत आहेस
तूं ...........
येथे थांब !
व
समस्या सोडविण्या ऐवजी
नवीन समस्या निर्माण कर.
तो सुध्दा तुझा प्रवासच असेल.
मी......
जन्माला येताना विचार केला नव्हता.
माझ्या इच्छेने मी जन्मास आलो नव्हतो.
माझ्यासमोर ध्येय नव्हते.
विचार......
कल्पना विरहित......
माझा प्रवास सुरु झाला होता.
तसा मी रिकामाच होतो.
अहंकार, मनाच्या विविध कल्पना
संकल्प, स्मृती, वृत्तीदोष या दृष्टीने
रिकामी. पूर्ण रिकामी होतो.
मला चालता येत नसल्या पासून
प्रवास सुरु झाला तो आजतागयात.
वाटचाल सुरु आहे.
कोठे जावयाचे ते माहित नाही.
कोठे मुक्काम करावा लागणार.....
तेंही माहित नाही.
मात्र एक गोष्ट मला जाणवते.
ज्या क्षणाला माझा प्रवास थांबणार
त्या क्षणाला.....
माझा मृत्यु झाला असे म्हटले जाईल.
पण खरं सांगू......
ती.....
नवीन प्रवासाची.....
सुरुवात असेल.

# (११) हे परमात्मन् !

माझे जीवनपुष्प
तुला मी केव्हांच अर्पण
केले आहे.
आता माझ्याकडे काय राहिले ?
आणि म्हणून......
कोणी दान मागावयास आला....
तर मी,
गप्प राहतो कारण.....
मी तुझी ठेव असल्याने....
मला खर्च करण्याचा अधिकार कोठे रहातो?
एक दिवस ....
एक अतीथी ....
भल्या पहाटे माझ्याकडे आला.
त्याने तुझ्या नावाची घोषणा करून
माझ्याकडे एक पळीभर पाणी
व भाकर मागितली.
त्या अतीथी ऐवजी मला तुझेच दर्शन घडले.
त्याला
घरात बसवून
भाकरी व पाणी दिले.
तो म्हणाला,
" माझेंच मला मिळालें - - -
तुझे काय दिलेस ? "
मी त्याला म्हणालों
" मी व माझे अजून तुझ्याकडे
आहे काय? "
तो म्हणाला,
' देह असे पर्यंत - - -
असेच होत असते - - - -
त्याला तुझा व माझा इलाज नाहीं '
असें म्हणून - - -
तो झपझप पावले टाकत
निघून गेला.
माझ्याकडे काय राहिले
याचे मला उत्तर मिळालें !
तुझ्याचकडून !

# (१२) हे परमात्मन् !

तुला भेटण्यासाठी
मी - - -
येत असता
वाटेंत
एक नदी आढळली.
मला
पलिकडे जावयाचे होते.
एक - - -
नावाडी दिसला म्हणून
त्याला मी बोलाविलें.
प्रथम
मी व नावाडी
अेवढेच होडीत होतो.
सोसाटयाचा वारा वहात होता.
होडी
पलीकडे नेताना
नावाडयाला
वल्हे मारणे
जड जात होतें.
अेवढयांत
होडीच्या आंत
मला
एक मुंगी आढळली.
ती इवली मुंगी
वा-याला न जुमानता
माझ्या पायाला बिलगली.
मी गप्पच राहिलो.
होडी किना-यावर आली.
नावाडयाला पैसे दिले.
व
खाली उतरलो.
अर्थात सोबत मुंगीही होती.
माझ्या पायाच्या आधाराने
तिने किनारा गाठला होता.
काहीं अंतर चालल्यावर
मी दमलों.
पुढे चालवेना.
एका झाडाच्या सावलींत
मी झोपी गेलो.
काही वेळाने मुंगीने
किंचित् चावा घेतला असावा
म्हणून झोपेतच माझ्या डाव्या **हाताने**
तिला चिरडले व तेवढयांतच
मला जाग आली.
मी पायाकडे पाहिले
ती चिरडली गेली होती.
हे परमात्मन्
जिने मला वादळी वा-यांत
सोबत केली
तिला माझ्याकडून मारविण्यांत
तुझा हेतु कोणता?
माझी थप्पड तुला लागली नाहीं ना !
चिरडली गेलेली मुंगी
माझ्या सोबत घेऊन
वाट चालतो
तुझ्या भेटीसाठी !

# (१३) किती तरी वर्षे झाली !

मी - - -
लहानाचा मोठा - - -
येथेच झालो.
एकाच ठिकाणी - - -
स्थीरउभे राहणें - - -
माझ्या नशिबी आलें.
पावसाच्या वेळीं - - -
पाऊस - - -
उन्हाच्या वेळी - - -
कडक ऊन - - -
सहन करीत
मी - - -
दिवस घालवित होतों.
माझ्या जवळून - - -
पायवाट गेली असती - - -
तर - - -
अनेक वाटसरु
या वाटेनें गेले असते.
त्यांना सावली - - -
मिळाली असती.
तेवढींच मला
सोबत झाली असती.
जमीन ओसाड होती.
शेतकरी सुध्दा माझ्या बाजूला
फिरकले नाहींत.
फळे फुलें असती
तर - - -
भ्रमर - - -
अगर - - -
मुलें आली असती.
कित्येक मैल
मागे पुढे
डावीकडे - - - उजवीकडे
ओसाड जमिनीचा समुद्र - - -
दृष्टीमध्यें न मावणारा
पण सृष्टीमध्यें असलेला !
हे परमात्मन्
तूं - - -
एकमेव एक आहेस
मी मात्र - - -
एकटाच आहे - - -
पण - - -
एकटा कसा?
मी तुझ्यांतच आहे.
तुझीं स्पंदने मला सोबत देत आहेत.
मला तें कळावयास हवें होतें
आतां तें कळत आहे
एकटेपणा गेल्यानंतर - - -

# (१४) हे भगवन्

सुका दुष्काळ - - - !
पाण्याचा थेंब दिसेनासा झाला.
पाण्याला सुवर्णाचें महत्व आलें.
लोक पाण्यासाठीं - - -
आपापलीं भांडी घेऊन - - -
सर्वत्र - - -
सैरावैरा - - -
धावूं लागले.
गांवांत - - -
पक्षी दिसेनात.
गुरे हाडांचे पिंजरे घेऊन - - -
ओरडूं लागलीं.
माणसें विहिरी मागून विहिरी
खरपून खरपून
पाणी घ्यावयास लागलीं.
मासे पाण्याविना
तडफडूं लागले.
मानवानो......... !
आम्हाला चार थेंब तरी पाणी ठेवा ना !
तलावांतील कमळें तसेंच म्हणालीं.
कोण लक्ष देतो त्यांच्याकडे?
ही पृथ्वी म्हणजे
आपलीच भोग्य वस्तु
असाच ग्रह मानवानें करुन घेतला
असावा !
इतक्यांत पाऊस पडण्याचें
चिन्ह दिसेना.
आता लोकांचे विलाप
ऐकूं येऊं लागले.
शेजारच्या देशांतील मानव
मदतीला धाऊन आले.
विमानांतून अन्नाची पाकिटें
येऊं लागलीं.
पाण्याचे टँकर,
एका मागून एक - - -
धावूं लागले.
दुष्काळग्रस्त मानवाचा प्रश्न **मिटला'**
पण,- - -
कुठून तरी खोल आवाज **आला,**
'टँकरच्या पाण्यांतील चार **थेंब**
या तलावांत टाकाल काय?'
ओलसर जमिनींत तगून
राहिलेल्या कमळाचा होता **तो !**
तिकडे कोणीच लक्ष दिलें **नाहीं**
आणि इतक्यांत
आकाशांत ढगांचा गडगडाट
सुरु होऊन पाण्याचा
वर्षाव सुरु झाला
हे भगवन् !
तुझ्या दयेला पार नाहीं.

# भाग २ रा

(१) भक्तीचे महत्व

(२) नाम कास धरा

(३) विठ्ठलाचा ध्यास

(४) प्रकाशा तम न दिसे

(५) विश्वंभर उभा

(६) बंधमुक्त

(७) आम्ही धरुं सोय

(८) त्या मौनाचे भाष्य

(९) माझे काहीं नसे

(१०) बिंबे चक्रपाणी

(११) आत्माराम जागा

(१२) त्याला नाही अंत

(१३) व्यक्त करा देवत्व

(१४) दुःख वाहूं नका

(१५) वंदन करी मी

(१६) अंतराळ वितळले

(१७) स्वामी समर्थ पंचारति

# (१) भक्तीचे महत्व

निश्चय करितों । हाकलाया 'मी' ला ।
नाहीं तो राहिला । दीर्घ काळ ।।१।।
नांव नको रुप । गुण नको काही ।
तरी सर्व राही । स्वभावेच ।।२।।
स्वभाव ये आड । सत्याच्या मार्गांत ।
प्रयत्नांना अंत । मुळींनसे ।।३।।
म्हणोन भक्तीची । कास धरु आम्हीं ।
प्रयत्न न कामी । कदा येई ।।४।।
सद्गुरुस वाटे । भक्तीचें महत्त्व ।
आत्मज्ञान प्राप्त । भक्ती बळें ।।५।।

# (२) नाम कास धरा

सर्वांच्या अंतरी । सद्गुरु राहतो
    सदा तो असतो । अंतर्यामी ।।१।।
सद्गुरु भेटण्या । नको भटकणें
    स्वरुप पाहणें । दर्शनार्थ ।।२।।
चित्त स्थीर करा । चैतन्याला भेटा ।
    सद्गुरुस गाठा । परमात्मा तो ।।३।।
एक अहंकार । सदा आड येतो ।
    देह स्तुती गातो । सातत्यानें ।।४।।
चैतन्या परता । परात्पर असे ।
    निःशब्द होत से । वाणी तेथे ।।५।।
नाम कास धरा । सद्गुरु विनवी
    संगती धरावी । सज्जनाची ।।६।।

# (३) विठ्ठलाचा ध्यास

विठोबाचें नाव
अमृता समान
करु ते प्राशन
रात्रंदिन ।।१।।
विठ्ठल अमुचा
विठ्ठल तुमचा
आशीर्वाद त्याचा
मिळे सर्वां ।।२।।
विठ्ठल तो गाऊ
विठ्ठल तो ध्यावू
मन तें रमवूं
भजनामृतें ।।३।।
विठ्ठलाचा ध्यास
विठ्ठल पाहतो
विठ्ठल नाच तो
अमुच्या संगे ।।४।।
अमुचा विठ्ठल
तुमचा विठ्ठल
सर्वांचा विठ्ठल
रखुमापती ।।५।।
सद्‌गुरुस वाटे
विठ्ठल हृदयी
वसे चक्रपाणी
विठ्ठलरुपें ।।६।।

# (४) प्रकाशा तम न दिसे

थोडी फेरी
थोडी घेरी
काय करुं ?
जावें दुरी
कोण जाणें, केव्हां तरी,
घडे येणें शुन्यापरी !- - - (१)
येणें जाणें
येणे जाणे
सदाचेच
तें घडणे
नसे केव्हां, ते थांबणे...... कोणी कोणा, न पुसणे...... (२)
इतुक्यांत वेलपान
सुगंधले फुलरान
म्हणे जरा
देरे ध्यान
होई कसे, चींब मन
रवि बिंब होई मौन...... (३)
वाट चाले प्रकाशाची
मळलेली परी नसे
नसलेली कशी दिसे !
प्रकाशा न तम दिसे...

# (५) विश्वंभर उभा

उठा पाहे हरी । निघा महाद्वारीं ।।
वाट पाहे हरी । उभा असे ।। १ ।।
त्याला नको फुलें । नको तो नैवेद्य ।
हवी तया साद । हृदयाची ।। २ ।।
नको त्या उपास । करा उपवास ।।
धरा निजध्यास । प्रत्ययार्थ ।। ३ ।।
बिजांतून जैसा । अंकूर उगवे ।।
भक्ता हरी गावे । भाव विश्वीं ।। ४ ।।
सद्गुरु हृदयी । विश्वंभर उभा ।।
हात त्याचा नभा । तोलतसे ।। ५ ।।

## (६) बंधमुक्त

विवेकाचे बोल । सदा ते बोलावे ।।
    हरीनाम गावे । शांतीसाठी ।। १ ।।
प्रपंच करीता । स्मरण असावें ।।
    देवाला करावे । आपलेसें ।। २ ।।
शांती असे ब्रह्म । शांती असे धर्म ।।
    शांतीतही कर्म । चोख होते ।। ३ ।।
राष्ट्रीयत्व जात । पक्ष धर्म भेद ।
    त्यांना थारा दाद । देऊं नका ।। ४ ।।
हवेला ना भींती । हवा मुक्त असे ।।
    आम्हीं व्हावे तैसे । बंधमुक्त ।। ५ ।।
प्रकाशा असे का । बंधन सीमांचे ।।
    वागणे अमुचे । तैसे व्हावें ।। ६ ।।
पर्जन्या असे का । वर्षाव बंधन ।।
    बंधमुक्त जन । आधी व्हावा ।। ७ ।।
आकाश सर्वांचे । विश्वबांधवांचे ।।
    यथार्थ सर्वांचे । हीत पाहूं ।। ८ ।।
सद्‌गुरुस वाटे । भेदाभेद टाका ।।
    वेळ लावूं नका । करा त्वरा ।। ९ ।।

## (७) आम्ही धरू सोय

कोण येई सांगा । दुसऱ्या जगांत ।
ऐकण्या संगीत । विश्वाचें तें ।। १ ।।
विश्वाचे संगीत । ऐकण्या आम्हाला ।
का लागे जायाला । अन्य जगीं ।। २ ।।
कानांची जरुरी । संगीत ऐकण्या ।
वृथा भटकण्या । अर्थ नाहीं ।। ३ ।।
जेथे आम्ही असूं । तेथे सर्व काही ।
पूर्ण लक्ष राही । ते पाहण्या ।। ४ ।।
घरोघरी ऐका । मुलांचे संगीत ।
रानोरानी गीत । पक्षांचे तें ।। ५ ।।
शेता शेतांतुनी । वारा शीळ घाली ।
पिकें वर खाली । लाटा होती ।। ६ ।।
लाटांचे तें गीत । ऐका मनसोक्त ।
निसर्ग संगीत । अमृत तें ।। ७ ।।
नामस्मरणाचे । आम्हा आहे वेड ।
तेंच गीत गोड । आम्हां लागी ।। ८ ।।
आहे तेंच जग । आम्हा असे प्रिय ।
आम्ही धरुं सोय । कर्तव्याची ।। ९ ।।
कर्मयोगी गीत । असतें विश्वाचे ।
सद्‌गुरु गीताचे । सार ऐके ।। १० ।।

## (८) माझे काही नसे

काम बहु केले । थकवा न आला ।
उत्साह लाभला । रोमरोमी ।। १ ।।
नाम संभाळोन । आजार भोगला ।
शक्ती मिळे मला । उभा होण्या ।। २ ।।
चालणे बोलणे । त्याच्या कृपे होई ।
सोबत तो राही । निश्चयाने ।। ३ ।।
सर्वत्र तो असे । माझ्यातही वसे ।
माझे काही नसे । त्याची सत्ता ।। ४ ।।
सद्‌गुरुचा बोल । त्याची वाणी असे ।
कमी काही नसे । देवाघरी ।। ५ ।।

## (९) त्या मौनाचे भाष्य

नाहीं अधिकार । मला बोलण्याचा ।
परी पामराचा । बोल ऐका ।। १ ।।
लोक का बोलती । देव नाही ऐसे ।
लोका लागे पिसे । सांगा कैसे ।। २ ।।
माझ्याशी बोलसी । लोका कैसे सांगू ।
कैसे मी पटवू । त्याना तैसे ।। ३ ।।
देव म्हणे मला । काही बोलू नको ।
लोका देव नको । स्वार्थ हवा ।। ४ ।।
मौन आकलन । भक्तीविना नाही ।
त्या मौना तू ं पाही । भक्तीनेंच ।। ५ ।।
त्या मौनाचे भाष्य । तुझ्या कानी येते ।
मी बोले वाटते । तुजलागी ।। ६ ।।
सद्गुरुस वाटे । देवा भेटण्याला ।
व्हावे लागे त्याला । भक्ती पूर्ण ।। ७ ।।

## (१०) बिंबे चक्रपाणी

हरी घरीं येण्या । आहे सोपी वाट ।
सरळ धोपट । भेटण्याची ।। १ ।।
अट आहे एक । ठेवा दुरी ओझे ।
नको 'मी मी' माझे । मी पणाचे ।। २ ।।
' मी ' पणा अज्ञान । वृथा अभिमान ।
न घडे दर्शन । अनंताचे ।। ३ ।।
सद्गुरुस वाटे । निरामय मनीं ।
बिंबे चक्रपाणी । क्षणार्धांत ।। ४ ।।

## (११) आत्माराम जागा

प्रभा उठवते । रात्रीच्या अंधारा ।
मला गार वारा । उठवितो ।। १ ।।
जाग येता येता । जाग आणि नाम ।
मला देती प्रेम । ब्रम्हांडाचे ।। २ ।।
नामाचे स्मरण । ऐसे कैसे घडे ।
कोण देई धडे । झोपे माजी ।। ३ ।।
आत्माराम जागा । दाही दिशांतरी ।
सद्‌गुरु अंतरी । नाम घेतो ।। ४ ।।

## (१२) त्याला नाही अंत

शब्दां पलिकडे । आम्हीं राहू ऐसे ।
निःशब्द होतसे । सर्व काही ।। १ ।।
असें असे जरी । सोहम् ये हृदयी ।
शब्द नसे काही । स्थिती असे ।। २ ।।
स्मृती नसे काही । विचार गोठले ।
अनुभव नुरले । असणे आहे ।। ३ ।।
दुःख नाहीं काही । सुख नसे काही ।
सर्व असे काही । एकत्वाने ।। ४ ।।
तेथे नाही द्वैत । सद्‌गुरुस वाटे ।
भगवंत भेटे । परमात्मा ।। ५ ।।
अशा त्या भेटींत । माझा मीच असे ।
दुजे काही नसे । माझ्या विना ।। ६ ।।

# (१३) व्यक्त करा देवत्व

अनंत तारे अंतर्यामीं
अगणित गगनें असती
अनंत विश्वें अमुच्या हृदयी
अमाप क्षितीजे वसती ....: ।। १ ।।
‘ मी ” पण नाही ‘ तू ’ पण नाही
सर्व भिन्नता गळते
अमुच्या राष्ट्रा भींती नसती
चराचरांना कळते ..... ।। २ ।।
माझें माझें कशास म्हणतां ?
झटकुन टाका माशी कशी
अेकत्वाचे अंश असोनी
माये मागे धाव कशी ? ।। ३ ।।
मला विचारा मार्ग दावितो ।
मोहांतुन व्हा मुक्त तसे
व्यक्त करा देवत्व कृती तुनि
करुणा मुर्ती व्हा तैसे ...... ।। ४ ।।
दुजा नसे तो देव वेगळा
तुमच्या हृदयी देव वसे
व्यक्त करा देवत्व पाहण्या
सद्‌गुरु तुम्हां सांगतसे.....।।५ ।।

# (१४) दुःख वाहूं नका

वेलीचें हे मूल । फुलो वेलीवरी ।
मातेविना दुरी । जाऊं नये ।। १ ।।
नका तोडू त्याला । दुःख वाहूं नका ।
देवा अर्पू नका । वेदना ती ।। २ ।।
वेलीच्या मुळांत । पळी पाणी घाला ।
फुल ये जन्माला । कळींतुनी ।। ३ ।।
फुलाचा सुगंध । तुमच्या हृदयी ।
होतो भावमयी । क्षणार्धात ।। ४ ।।
प्रणवाचा नाद । सुगंध धरील ।
आचार होईल । पुजामय ।। ५ ।।
सद्‌गुरु प्रार्थीतो । तुम्हा भाविकांना
भाव सुमनांना । देवा अर्पा ।। ६ ।।

# (१५) वंदन करी मी

गोर गरिबा साहय कराया
जाती जे त्यांना
वंदन करी मी देव मानुनी
त्या पुण्यात्म्यांना - - - - (१)
दया भाव अन करुणामूर्ती
रक्षिती वृक्षांना
वंदन करी मी देव मानुनी
त्या पुण्यात्म्यांना - - - - (२)
वृक्ष ऋषी जे व्रतस्थ असती
मानिती त्या मौना
वंदन करी मी देव मानुनी
त्या पुण्यात्म्यांना - - - - (३)
साधुवृत्तीने पशुपक्षांशी
वागती थोरांना
सद्‌गुरु वंदी भूदेवाना
पावन आत्म्याना - - - - (४)

## (१६) अंतराळ वितळलें

कैसे येणे उगवलें ?
कैसे वाटे ते रुजलें ?
ठावें कैसेंनाही मला !
ऐसे घडले तैसे घडलें - - - (१)
कसा गेलों शोधाया तें ?
कसा उरलों समजेना
कधी वाटे भ्रम होता
सत्या सत्य समजेना - - - (२)
वाटचाल सुरु होता.
दाणेदार माती होती.
गंधवती सोबतीला
संध्येचीही कात होती - - - (३)
माझा आता मीही नाही.
माझे आता कोणी नाही.
माझी आता कात राहे.
मला आता नाव नाहीं - - - (४)
जैसे येणें उगवले.
तैसे असणे येथे झाले.
सद्‌गुरुस धार दिसे
अंतराळ वितळलें - - - (५)

## (१७) स्वामी समर्थ पंचारति

धन्य धन्य तुम्ही जन । जे जे करिती स्वामी स्मरण
स्वामी समर्थ ध्यानी आणून । कर्तव्या जागती आपुल्या ।।१।।
म्हणा स्वामी समर्थ । जय जय स्वामी समर्थ ।
नाम जपी व्हाल समर्थ । छायेखालीं समर्थांच्या ।।२।।
स्वामी समर्थ पाठीराखे । भक्तजना न होती पारखे ।
ब्रह्मांड नायक सर्व सुखे । देती निश्चयें सांगतों ।।३।।
श्री स्वामी समर्थ । सर्वत्र त्यांचा संचार होत ।
सर्व स्थळीं असती निश्चित । संकट काली हाक मारा ।।४।।
नको अहंकार 'मी' 'मी' । स्वामी चरण धरा तुम्हीं ।
सर्व दुःखें जाती पळोनी । तुमच्या हृदयी प्रकटती ते ।।५।।
पंच ओव्या पंचारती । जो नेमे ओवाळी समर्था प्रती ।
त्यास होय आनंद प्राप्ती । सद्‌गुरु प्रभु सांगतसे ।।६।।

(आनंदनाथ कृत श्री स्वामी समर्थ स्तवन गाथा यांतून)

# : आमची प्रकाशने :

| | | |
|---|---|---|
| १) | वा. रा. ढवळे व्यक्ती आणि कार्य-संपादक | |
| | गुं. फ. आजगांवकर पृष्ठे १४० | किं. ३० रु. |
| २) | नटवर्य माधवराव वालावलकर: पृष्ठे १६०, | किं. २५ रु. |
| ३) | क्रांतीपराग (काव्यसंग्रह) प्रस्तावना सदानंद रेगे प्रभु गुंफराज | किं. १० रु. |
| ४) | प्राचीन मराठी संतकवी : भाग २, ३ | |
| | महाराष्ट्र भाषा भूषण ज. र. आजगांवकर पृष्ठे १००० | किं. ६०+६० |
| ५) | भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास: पृष्ठे ३२० डॉ. पंढरीनाथ प्रभू | |
| ६) | सेनापती भोसले: गुं.फ. आजगांवकर, | किं. १० रु. |
| ७) | आजगांव दर्शन : गुं.फ. आजगांवकर, | किं. १० रु. |
| ८) | वालावल दर्शन : गुं.फ. आजगांवकर, | किं. १० रु. |
| ९) | संरक्षण शास्त्र व तंत्र : कॅ. मा. कृ. शिंदे | किं. ३० रु. |
| १०) | कुडाळ देशकर : खंड १ ते ३ | किं. ५० रु. |
| ११) | जीवन ह्याला नाव : | किं. १० रु. |
| १२) | प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी : ज. र. आजगांवकर | किं. २० रु. |
| १३) | नटवर्य परशुराम सामंत : | किं. ३० रु. |
| १४) | स्वरभूषण वसंत देसाई : गुं.फ. आजगांवकर | किं. २ रु. |
| १५) | माझी वाटचाल (आत्मचरित्र) : डॉ. नाईक | किं. १५ रु. |
| १६) | गुं.फ. आजगांवकर (चरित्र) : | किं. १० रु. |
| १७) | स्वानंद लहरी ले. स्वामी चिदानंद संपादन - गुं.फ. आजगांवकर | |
| १८) | अनंत शिवाजी देसाई टोपीवाले : | किं. १० रु. |
| | सद्‌गुरु प्रभु विरचित | |
| १९) | माऊली माझी - कृपेची साऊली : ले. स. फ. आजगांवकर | किं. १० रु. |
| २०) | सो हम्‌ ध्यान तरंग ले. सद्‌गुरु प्रभू | किं. २ रु. |
| २१) | ओवी नामामृत सार (रामनाम महात्म्य) सद्‌गुरु प्रभु | किं. २ रु. |
| २२) | 'भाव माझ्या अंतरीचे' (कविता संग्रह) सद्‌गुरु प्रभु | किं. ५ रु. |
| २३) | 'आत्मसंवाद' : सद्‌गुरु प्रभु | किं. २ रु. |
| २४) | श्री. देव वेतोबा स्तवन मुक्तावली : सद्‌गुरु प्रभु | किं. २ रु. |
| २५) | दत्तावतार वासुदेवानन्द सरस्वती (एकध्यायी ओवी चरित्र) | किं. २ रु. |
| २६) | श्रीदेवी सातेरी स्तोत्र | किं. २ रु. |
| २७) | मंत्रालयाचे श्री राघवेंद्र स्वामी | किं. २ रु. |
| २८) | श्री सहजानंद महाराज स्तोत्र | किं. २ रु. |
| २९) | श्री चैतन्यस्वामी महाराज | किं. २ रु. |
| ३०) | हे भगवन् ! (मुक्तछंद) | किं. २ रु. |
| ३१) | ईशावास्योप निषद् (ओवीबद्ध) | किं. २ रु. |
| ३२) | आज्ञार्थी गीता : व. दि. कुलकर्णी | किं. १५ रु. |

पत्ता :

**गुं. फ. आजगांवकर**

१७ के. जी. बी. निवास, मॅजिस्टिक समोर, गिरगांव, मुं. ४.

आनंदनाथ महाराजकृत –

**स्वामी समर्थ स्तवनगाथा** (पृष्ठ ६०० ) कि. २१० रु.

**भारतांतील शास्त्रांचा उद्गम व विकास** डॉ. पम कि. १२५ रु.

**प्राचीन मराठी संतकवि** ले. ज. र. आजगांवकर

भाग २ व ३ (पृष्ठ १००० ) कि. १२० रु.

**श्री पद्मनाभतीर्थ स्वामी व स्वामी समर्थ परंपरा**

स्तोत्रे. संतचरित्रें. दत्तसांप्रदाईकांना अत्यंत उपयुक्त. कि. ६० रु.

पत्ता : **गुं. फ. आजगांवकर**

प्रबोधन रिसर्च असोसिएट्स

१७. के. जी. बी. निवास. मुंबई-४.